रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनी
Rambhau Mhalgi Prabodhini

# दहावे रामभाऊ म्हाळगी स्मृती व्याख्यान

## रविवार, दि. १२ जुलै, २००९

रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनी गेली ९ वर्षे कै. रामभाऊ म्हाळगी यांच्या स्मृतीप्रित्यर्थ व्याख्यानाचे आयोजन करत असते. दरवर्षी होणारे हे व्याख्यान प्रत्येकवेळी वेगवेगळ्या शहरात योजले जाते. आतापर्यंत नाशिक, पुणे, सोलापूर, कल्याण इ. ठिकाणी योजण्यात आले होते. यंदाचे दहावे स्मृती व्याख्यान भारतीय विचार मंच, नागपूर या संस्थेच्या सहयोगाने शिक्षक सहकारी बॅंक महाल, नागपूर येथे **रविवार, दि. १२ जुलै, रोजी** योजण्यात आले होते.

माओवादी दहशतवादामुळे देशातील अनेक राज्ये ग्रस्त आहेत. महाराष्ट्राच्या शेजारील छत्तीसगडमध्ये तर या कारवायांनी उच्छाद मांडला आहे. नागपूर हे छत्तीसगड राज्याजवळ असल्यामुळे यंदाचे व्याख्यान नागपूर मध्ये करण्याचे ठरले. **माओवादी आतंकवाद के कारण विकास में बढता क्षेत्रीय असंतुलन** या विषयावर योजलेल्या व्याख्यानासाठी मुख्य वक्ते म्हणून छत्तीसगडचे मा. मुख्यमंत्री, डॉ. रमण सिंह उपस्थित राहणार होते. मात्र व्याख्यानाच्या दिवशीच ३२ सुरक्षा कर्मचाऱ्यांची माओवाद्यांनी निर्घृण हत्या केल्यामुळे ते येऊ शकले नाहीत. तसेच म्हाळगी प्रबोधिनीचे व कार्यक्रमाचे अध्यक्ष खा. गोपीनाथ मुंडे हे ही कार्यक्रमाला उपस्थित राहू शकले नाहीत. त्यामुळे कार्यक्रमाचे अध्यक्ष स्थान भाजपा– महाराष्ट्र प्रदेशाचे मा. अध्यक्ष आ. नितिन गडकरी यांनी भूषविले. म्हाळगी प्रबोधिनीचे महासंचालक डॉ. विनय सहस्रबुद्धे यांनी माओवादी कारवायांच्या माहितीचे सादरीकरण केले. माओवाद्यांचे नियोजन, लक्ष्यित गट व त्यातून दहशत निर्माण करुन त्या क्षेत्राचा विकास थांबवणे, विकास थांबला की लोकांना भडकावून आपले अंकीत करणे आदि विषय सादरीकरणातून पुढे आले. या सर्वाचा परिणाम म्हणून देशभरात आज विकासाच्या कार्यात निर्माण झालेले असंतुलन त्यांनी उपस्थितांना ज्ञात करुन दिले.

मा. नितिन गडकरी यांनी माओग्रस्त भागातही विकास कसा करता येईल. याबाबत त्यांनी अनुभवलेले प्रयोग सर्वांसमोर मांडले. सरकारची भूमिका आणि माओवाद्यांशी कसे लढले पाहिजे हे त्यांनी स्पष्ट केले. त्याचबरोबर या भागातील खनिज संपत्तीचा उपयोग विकासासाठी केला तर ह्या प्रश्नाला समाधानकारक उत्तर देता येईल हे ही त्यांनी आवर्जून सांगितले.

कार्यक्रमाचे सूत्र संचालन प्रबोधिनीचे कार्यकारी संचालक श्री. रवींद्र साठे यांनी केले तर प्रास्ताविक व सर्वांचे स्वागत प्रबोधिनीचे विश्वस्त आ. देवेंद्र फडणवीस यांनी केले. भारतीय विचार मंचाचे श्री. गुरुनाथ मोडक यांनी आभार प्रदर्शन केले. संपूर्ण वंदे मातरम्‌ने कार्यक्रमाची सांगता झाली.

**********